


आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ८१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


# ट्रॅक्टर अंगावर घालून आजोबांची हत्या

## ट्रॅक्टरच्या साऊंडवरून झालेल्या वादाचा राग । नेवासा तालुक्यातील सौंदाळा येथील धक्कादायक घटना

**● नेवासा । वीरभूमी –**

ट्रॅक्टरच्या साऊंडचा आवाज कमी करण्यास सांगितल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तरुणाने आपल्या चुलत आजोबांच्या (आईचे चुलते) अंगावर ट्रॅक्टर घातल्याची धक्कादायक घटना नेवासा तालुक्यातील सौंदाळा येथे घडली. या घटनेत संभाजी आसाराम साळुंके (वय ५९) यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. याप्रकरणी विशाल नंदू आरगडे (रा. सौंदाळा) याच्याविरुद्ध नेवासा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत सोमनाथ संभाजी साळुंके (वय ३६, व्यवसाय-शेती, रा. सौंदाळा, ता. नेवासा) यांनी नेवासा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, मी, माझे वडील संभाजी आसाराम साळुंके, आई, पत्नी आणि दोन मुले असे एकत्र राहतो. माझ्या शेजारी विशाल नंदू आरगडे हा त्याच्या कुटुंबासह राहतो. त्याच्याकडे महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर आहे.

१२ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास माझे वडील संभाजी हे रानात शेळ्या चारून घरी आले. त्यावेळी विशाल याने त्याच्या ट्रॅक्टरचा साऊंड मोठ्या आवाजात केल्याने शेळ्या घाबरून बाजूला पळाल्या. त्यामुळे वडील संभाजी यांनी विशालला, तू तुझ्या ट्रॅक्टरच्या साऊंडचा आवाज कमी कर, असे सांगितले. याच कारणावरून विशाल आरगडे आणि माझे वडील संभाजी यांच्यात शिवीगाळ व दमदाटी झाली.

यावेळी विशाल नंदू आरगडे याने संभाजी यांना, मी तुला माझ्या ट्रॅक्टरखाली घालून मारून टाकीन, अशी धमकी दिली होती. मात्र, या शिवीगाळ व दमदाटीबाबत वडिलांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली नव्हती.

१३ सप्टेंबर रोजी सकाळी सातच्या सुमारास माझे वडील संभाजी आसाराम साळुंके हे आमची स्प्लेंडर मोटारसायकल (एमएच १६ पी ६३५१) घेऊन भेंडा येथील भारत पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी गेले होते. त्यानंतर सकाळी साडेसातच्या सुमारास माझा चुलतभाऊ दादासाहेब मोहन साळुंके याचा मला फोन आला. त्याने सांगितले की, भारत पेट्रोल पंप, भेंडा येथे विशाल नंदू आरगडे याने कालच्या भांडणाच्या कारणावरून त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर संभाजी यांच्या अंगावर घालून त्यांना गंभीर जखमी केले असून, ट्रॅक्टर घेऊन तो तेथून पळून गेला आहे.

त्यानंतर मी भेंडा येथील पेट्रोल पंपावर गेलो असता वडील संभाजी यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झालेली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याचे दिसून आले. त्यानंतर मी, भाऊ दादासाहेब आणि तेथे जमलेल्या नागरिकांच्या मदतीने वडिलांना रुग्णवाहिकेतून साई सेवा हॉस्पिटल, नेवासा फाटा येथे दाखल केले.

साई सेवा हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी संभाजी यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे नेण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्यांना रुग्णवाहिकेतून अहिल्यानगर येथे उपचारासाठी घेऊन जात असताना ते बेशुद्ध झाले. त्यामुळे त्यांना ग्रामीण रुग्णालय, नेवासा फाटा येथे दुपारी १२.१० वाजता उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी करून संभाजी आसाराम साळुंके यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले.

वडिलांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांची हत्या केल्याप्रकरणी विशाल नंदू आरगडे (रा. सौंदाळा) याच्याविरुद्ध फिर्याद देण्यात आली. या फिर्यादीवरून नेवासा पोलिस ठाण्यात गु.र.नं. ०७६६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोनि. प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमोल पवार पुढील तपास करीत आहेत.

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### औकात

सुखाचे दिवस छोटे
दुःखाचे असतात फार
विझला जातो दिवा
उचलतात फक्त चार
साडेचार फूट जागाच
आपली सर्वांची औकात
भले भले गेले रे आधी
कधी समजणार बात !

## SPOT NEWS

### मुंबई विमानतळावर ५ कोटींचे सोने जप्त

**● मुंबई –** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून परदेशी बनावटीच्या सोन्याची तस्करी करणारे संघटित जाळे महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) उद्ध्वस्त केले. कारवाईत ३.४७ किलो सोन्याची धूळ मेणाच्या आठ कॅप्सूलमध्ये लपवून आणल्याचे उघड झाले. जप्त सोन्याची किंमत ५ कोटी ४७ लाख आहे. विमान कंपनीचे कर्मचारी, परदेशातून येणारे प्रवासी यांच्या संगनमतातून तस्करी सुरू असल्याचे समोर आले आहे. डीआरआयच्या मुंबई विभागीय पथकाला मिळालेल्या विशिष्ट माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली. विमानतळावरून बाहेर पडल्यानंतर एका विमान कंपनीच्या कर्मचा-यावर अधिका-यांनी पाळत ठेवली. संबंधित कर्मचारी विमानतळापासून सुमारे ५० किलोमीटर दूर गेल्यानंतर त्याला अडविण्यात आले. त्याची झडती घेतली असता सोन्याची धूळ असलेल्या मेणाच्या तीन कॅप्सूल आढळल्या. चौकशीत या कर्मचाऱ्याने विमानतळाच्या संक्रमण कक्षात एका प्रवाशाकडून सोने घेतल्याची माहिती दिली.

### फुलांच्या दरात वाढ

**● मुंबई –** गणेशोत्सव राज्यातील सर्वांत मोठा उत्सव आहे. या गणेशोत्सवासाठी भक्तांची लगबग सुरू झाली आहे. सणामुळे बाजारपेठा सजल्या आहेत. या गणेशोत्सवाला अवघा एक दिवस शिल्लक राहिला आहे. मायानगरी मुंबईतही बाप्पाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू आहे. सार्वजनिक गणेश मंडळ मंडपात, घरात गणरायाच्या स्वागतासाठी सजावट, आरास, मखर करण्याची तयारी सुरू झाली आहे. या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दादरच्या फूल मार्केटमध्येही मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

# ऑनलाइन ॲपवर मैत्री; निर्जनस्थळी बोलावून लुटमार करणारी टोळी गजाआड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

मोबाईलवरील ग्रिंडर ॲपद्वारे अनोळखी व्यक्तीशी मैत्री प्रस्थापित करून त्याला भेटण्यासाठी निर्जनस्थळी बोलावायचे आणि तेथे मारहाण करून लुटमार करायची, अशा प्रकारे गुन्हे करणाऱ्या तिघांच्या टोळीला कोतवाली पोलिसांनी जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी संशयित आरोपींकडून दुचाकी, दोन मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या प्रकरणी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर येथील एका व्यक्तीने कोतवाली पोलिस ठाण्यात ५ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादीशी आरोपींनी मोबाईलवरील ग्रिंडर ॲपच्या माध्यमातून मैत्री केली. त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी लिंक रोड, केडगाव येथे भेटण्यासाठी फिर्यादीस बोलावण्यात आले. त्यानुसार फिर्यादी तेथे गेले असता आरोपींनी संगनमत करून त्यांना मारहाण केली. तसेच त्यांच्याकडील १२ हजार ५०० रुपयांची रक्कम बळजबरीने काढून घेतली.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सपकाळे आणि गुन्हे प्रकटीकरण पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिस पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यास सुरुवात केली.

तपासादरम्यान हा गुन्हा यश मनोज भिंगारदिवे (वय २१, रा. संजयनगर, श्रीरामपूर), सिद्धांत दत्तात्रय जगताप (वय २२) आणि सुमित संजय गायकवाड (वय २२, दोघे रा. इंगळे वस्ती, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) या तिघांनी केल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून तिन्ही आरोपींना शिताफीने अटक केली. आरोपींकडून दुचाकी, दोन मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# खर्डा येथील तरुणाची हत्या प्रकरणाचा छडा; चार जण ताब्यात

**● जामखेड । वीरभूमी –**

डोळ्यांत मिरची पावडर टाकून कोयत्याने डोक्यात वार करत तरुणाची हत्या केल्याच्या खर्डा येथील खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला आहे. या प्रकरणात एका आरोपीसह तीन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. यातील आरोपी राहुरी तालुक्यातील असल्याचे तपासात समोर आले आहे.

दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी तान्हाजी भास्कर बोराडे (रा. माळेवाडी, ता. भूम, जि. धाराशिव) हे खर्डा येथे असताना मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या डोळ्यांत मिरची पावडर टाकली. त्यानंतर त्यांच्या डोक्यात कोयत्याने वार करून त्यांची हत्या केली. या घटनेनंतर खर्डा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याची प्राथमिक माहिती मिळताच पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करून आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलिस उपनिरीक्षक विकास जाधव तसेच पोलिस अंमलदार शाहीद शेख, अभिजीत अरकल, शामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल आजबे, अजिनाथ पाखरे, रमीजराजा आत्तार, अरुण मोरे, फुरकान शेख आणि प्रशांत राठोड यांचे पथक तयार केले.

# पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली; मनोज जरांगेंकडून पाणी आणि सलाईनही बंद

**● मुंबई । वीरभूमी –**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आझाद मैदान पोलिस स्टेशनने परवानगी दिलेली नाही. परवानगी अर्ज काल दुपारी पोलिसांकडे देण्यात आला होता. दरम्यान, सरकारला पुनर्विचार करून परवानगी द्यावीच लागेल. आतापासून सलाईन आणि पाणी देखील बंद करत आहे. १९ तारखेला आंदोलन होणारच, अशी भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली आहे.

वीरेंद्र पवार हे आझाद मैदान पोलिस ठाण्यात गेले होते. येथे त्यांनी पोलिस अधिका-यांशी चर्चा केली. आंदोलनास परवानगी नाकारण्यामागील कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही परवानगीचा अर्ज शनिवारी सादर करण्यात आला होता. आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्यात येणार असल्याचेही या अर्जात नमूद करण्यात आले होते.

गणेशोत्सवामुळे सुरक्षेचा प्रश्न : १४ सप्टेंबरपासून मुंबईत मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव सुरू होत आहे. त्यामुळे मोठा पोलिस बंदोबस्त तिथे लागणार आहे. या गर्दीत आंदोलन झाले तर सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल.



सुप्रीम कोर्टाच्या अमित सहानी केसमधील आदेश आणि मुंबई हायकोर्टाचे आदेश, तसेच 'जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम २०२५' मधील कलम ४६(५)(६) नुसार परवानगी देता येणार नाही.

जरांगे यांनी ४,००० ते ४,५०० आंदोलक येतील असे सांगितले आहे. पण आझाद मैदानात इतकी क्षमता नाही. यापूर्वी २०२४ मधील आंदोलनात वाहतूक, शाळा, व्यवसाय, रुग्णालयावर परिणाम झाला होता. यावेळीही मुंबईच्या जनजीवनावर परिणाम होईल.

२०२४ च्या आंदोलनात ५ हजार आंदोलक आले होते, काहींवर गुन्हे दाखल झाले होते. तसेच अर्जदाराने यापूर्वीच 'मुंबई बंद' करण्याचे आवाहन केल्याने कायदा- सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे. या कारणांमुळे आझाद मैदानात १९ सप्टेंबरपासूनच्या आंदोलनाला परवानगी नाकारत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ही शेवटची आणि आरपारची लढाई असून, १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटीतून मराठ्यांचे वादळ मुंबईकडे झेपावणार आहे. त्यानंतर १९ सप्टेंबर रोजी मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदानावर बेमुदत आमरण उपोषण सुरू करणार अशी घोषणा मनोज जरांगे यांनी केली होती. सकल मराठा बांधवांशी संवाद साधताना त्यांनी संपूर्ण मराठा समाजाने या लढाईचे साक्षीदार होण्यासाठी मुंबईत मोठ्या संख्येने दाखल होण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईतील हे आंदोलन शांततेत होईल, असा शब्द जरांगे यांनी दिला आहे. मात्र आंदोलनात आमच्या एखाद्या तरुणाचे रक्त सांडल्यास अवघ्या दहा मिनिटांत संपूर्ण महाराष्ट्र बंद करू, असा थेट इशाराही त्यांनी दिला. ज्यांना मुंबईत येणे शक्य नाही, त्यांनी आम्ही जाणा-या मार्गावर दीडशे कि. मी. पर्यंत आमच्यासोबत चालावे, असे आवाहन त्यांनी केले.




## SPOT NEWS



## रमेश कदम यांच्या वक्तव्याचा रिपब्लिकन सेनेकडून निषेध

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्याबद्दल माजी आमदार रमेश कदम यांनी अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर रमेश कदम यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी रिपब्लिकन सेनेचे शहर जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे म्हणाले की, माजी आमदार रमेश कदम यांनी अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी असलेल्या ३१२ कोटी रुपयांच्या निधीत भ्रष्टाचार केल्याचा आरोप आहे. तसेच, त्यांनी अन्यही अनेक प्रकारचे भ्रष्टाचार केल्याचा आरोप शिंदे यांनी केला. आंबेडकर कुटुंबीयांबद्दल पुन्हा अपशब्द वापरल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला. या आंदोलनात रिपब्लिकन सेनेचे जिल्हा महासचिव दिलीपराव साळवे, लक्ष्मण साखरे, जिल्हा संघटक गौतम वाघमारे, विठ्ठल वाघमोडे सर, सोमनाथ साठे, हरीश चक्रनारायण, महिला आघाडीच्या निता भिंगारदिवे, मंगल बरकडे, नेहा जावळे, विवेक विधाते यांच्यासह रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बांधकाम कामगारांना साईश्रद्धा फाउंडेशनने दिले मोफत कौशल्य प्रशिक्षण

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना कामाचा व्यावहारिक सराव, आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळावी तसेच त्यांच्या कौशल्याला रोजगाराची जोड मिळावी, या उद्देशाने साईश्रद्धा फाउंडेशनच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'बांधकाम कामगार कौशल्य विकास वृद्धीकरण प्रशिक्षण कार्यक्रम' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रशिक्षणाला बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत कामगारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणादरम्यान बांधकाम क्षेत्रात प्रत्यक्ष काम करताना आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाचा व्यावहारिक अनुभव, कौशल्यात सातत्याने वाढ, कामाची गुणवत्ता आणि त्यातून रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, अमित खामकर, नगरसेवक निखिल वारे, पै. महेश लोंढे, सुजय मोहिते, बाळासाहेब पवार, प्रा. हर्षल आगळे, प्रा. भगवान काटे, वाणी मॅडम, हराळ गुरुजी, युवा नेते सोमनाथ जाधव, अभी बोरुडे, विराज टाक, साईश्रद्धा फाउंडेशनच्या सचिव कु. श्रद्धा परकाळे, अर्चनाताई परकाळे आदी उपस्थित होते. यावेळी बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ध्येय गाठण्यासाठी आत्मविश्वासासोबत कठोर परिश्रम गरजेचे

### चैतालीताई काळे । राधाबाई काळे कन्या विद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

● **कोपरगाव । वीरभूमी –** तुमच्यामध्ये गुणवत्ता आहे, याची जाणीव स्वतःला होणे गरजेचे आहे. त्यामुळे कधीही नकारात्मक विचार करू नका. जीवनात यशस्वी व्हायचे असेल आणि इच्छित ध्येय गाठायचे असेल, तर आत्मविश्वासासोबत कठोर परिश्रमही आवश्यक आहेत, असा मौलिक सल्ला जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. चैतालीताई काळे यांनी विद्यार्थिनींना दिला.




सुरेगाव-कोळपेवाडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमी अंतर्गत मैदानी व लेखी परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन चैतालीताई काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थिनींशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

त्या म्हणाल्या, "ग्रामीण भागातील मुलींमध्ये प्रचंड क्षमता व जिद्द आहे. त्यामुळे कोणत्याही संकटाला न घाबरता आणि परिस्थितीमुळे खचून न जाता चिकाटी व कठोर मेहनतीच्या जोरावर स्वप्ने पूर्ण करावीत. शासकीय तसेच पोलीस सेवेत भरती होऊन देशाची सेवा करणे अभिमानास्पद आहे. मुलींनी या संधीचे सोने करावे."

रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या, विशेषतः मुलींच्या शिक्षणाला व सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. पोलीस दलात महिलांसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. योग्य मार्गदर्शनाअभावी ग्रामीण भागातील मुली या संधीपासून वंचित राहू नयेत, यासाठी सुरू करण्यात आलेली ही अकॅडमी त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"आई-वडील आपल्या भविष्यासाठी मोठे कष्ट घेतात, याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी. इतरांशी तुलना करण्यापेक्षा स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करा. सोशल मीडियाचा वापर केवळ फोटो व दिखाव्यासाठी न करता ज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअरसाठी करा. शिस्त, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर शाळेचे, शिक्षकांचे, समाजाचे आणि पालकांचे नाव उज्ज्वल करा," असे आवाहनही चैतालीताई काळे यांनी केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या १९९८च्या विज्ञान शाखेच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने, डॉ. दत्तात्रय कोळपे यांच्या प्रयत्नातून अकॅडमीतील विद्यार्थिनींना ड्रेसचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून सौ. मनीषा पानगव्हाणे उपस्थित होत्या.

कार्यक्रमास स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष कचरू कोळपे, सदस्य अशोकराव भगत, दिनकर वाकचौरे, बाळासाहेब ढोमसे, अविनाश काळे, प्राचार्या नीता केदार, पर्यवेक्षक किरण चांदगुडे, भाऊसाहेब आरोटे, अकॅडमी प्रमुख विक्रम कुलकर्णी, प्रशिक्षक सौ. सुरेखा मेहेरखांब, समन्वयक सौ. रोहिणी आभाळे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## अ‍ॅड. के. डी. धुमाळ यांना 'आनंदोत्सव'चा जीवनगौरव पुरस्कार

● **अकोले । वीरभूमी–** गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत असलेल्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च सन्मान मानला जाणारा 'जीवनगौरव पुरस्कार २०२६' अकोले तालुक्यातील ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. के. डी. धुमाळ यांना जाहीर झाला आहे. ट्रस्टचे चेअरमन प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी ही माहिती दिली.



साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या अनुदानातून तसेच आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तरीय साहित्य संमेलनात अ‍ॅड. धुमाळ यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. हे संमेलन दि. २४ व २५ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात होणार आहे. श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग महाप्रकल्पाच्या संयोजनातून संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

अ‍ॅड. धुमाळ हे ख्यातकीर्त विधिज्ञ असून अकोले नगरपंचायतीचे पहिले नगराध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. संस्कृती, कला व क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेल्या अजिंक्य क्रिकेट क्लबचे ते अध्यक्ष आहेत. तसेच पर्यावरणप्रेमी, ज्येष्ठ सामाजिक व सांस्कृतिक कार्यकर्ते म्हणून त्यांचे योगदान आहे. अकोले येथील महर्षी अगस्तिमुनी आश्रमाचे ते सेवाभावी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

'प्रवरा परिक्रमा' या सांस्कृतिक, जल व पर्यावरणविषयक उपक्रमाचे ते मार्गदर्शक असून साखर कारखाना, सहकारी सोसायट्या, दूध संघ आदी विविध संस्थांच्या व्यवस्थापनातही त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली आहे.

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने यापूर्वी अयोध्या येथील राममंदिर न्यासाचे महासचिव स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज, पद्मश्री पोपटराव पवार, चार्टर्ड अकाउंटंट सी. एल. मध्यान, कीर्तन केसरी सन्मानप्राप्त रंगनाथबुवा धर्माधिकारी, संगीततज्ज्ञ प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर आदी मान्यवरांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## सुवर्णयुगचे साहित्यरत्न व कलारत्न पुरस्कार जाहीर

### डॉ. कैलास दौंड, गणेश सरोदे यांचा गणेशोत्सवात होणार गौरव

● **पाथर्डी । वीरभूमी–** शहरातील सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे गणेशोत्सवानिमित्त दिला जाणारा यंदाचा प्रतिष्ठित साहित्यरत्न पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. कैलास दौंड यांना, तर कलारत्न पुरस्कार कलाशिक्षक गणेश सरोदे यांना जाहीर करण्यात आला आहे. मंडळाचे अध्यक्ष वैभव शेवाळे व उत्सव समितीचे अध्यक्ष गोपालसिंह शेखावत यांनी ही माहिती दिली.





साहित्य क्षेत्रात आपल्या लेखनातून स्वतंत्र ठसा उमटविणारे डॉ. कैलास दौंड हे पाथर्डी तालुक्यातील प्रसिद्ध साहित्यिक आहेत. त्यांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांना यंदाच्या साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या 'कापूसकाळ' या कादंबरीचा विद्यापीठाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश आहे. बाल व ललित साहित्य क्षेत्रातही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या लेखनातून ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव आणि मानवी संवेदनांचे प्रभावी चित्रण होते.

डॉ. दौंड यांची 'तुडवण', 'तिफण', 'खारुताईचे जंगल', 'वसाण', 'उसाच्या कविता', 'आनंदाचे गाणे', 'जाणिवांचे फुले', 'दयानिधी संत', 'आजचे शिक्षणयात्री' आदी २० हून अधिक पुस्तके, कादंबऱ्या, कवितासंग्रह व बालसाहित्य प्रकाशित झाले आहेत. साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक साहित्य संमेलनांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

दरम्यान, शहरातील एकलव्य शिक्षण संस्थेच्या एम. एम. निऱ्हाळी विद्यालयात अनेक वर्षांपासून कलाशिक्षक म्हणून कार्यरत असलेले गणेश सरोदे यांना यंदाचा कलारत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आपल्या कुंचल्यातून विविध कलाकृती साकारत त्यांनी कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. विशेषतः त्यांचे फळालेखन सर्वपरिचित असून, शाळेच्या फळ्यावर विविध प्रसंगी ते आकर्षक व कल्पक कलाकृती साकारतात. विद्यार्थ्यांमध्ये कलाविषयक आवड निर्माण करण्याबरोबरच आपल्या कलेतून शैक्षणिक वातावरण आनंददायी करण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत.

साहित्य व कला क्षेत्रातील या दोन्ही मान्यवरांच्या योगदानाची दखल घेत सुवर्णयुग तरुण मंडळाने त्यांची पुरस्कारासाठी निवड केली आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात येणार असून, या पुरस्कारांमुळे शहरातील साहित्यिक व कलावंतांच्या कार्याला प्रोत्साहन मिळणार आहे.

# शब्द, सूर अन् अभिनयातून हिंदीचा गौरव

### वसुंधरा अकॅडमीत उत्साहात हिंदी दिन । विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

● **अकोले । वीरभूमी–** हिंदी भाषेचे महत्त्व, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विद्यार्थ्यांमध्ये हिंदीविषयी प्रेम व अभिमान निर्माण करण्याच्या उद्देशाने वसुंधरा अकॅडमी, अकोले येथे हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली.

कार्यक्रमाची सुरुवात सोनिया कोल्हे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, सोनिया कोल्हे, खंडू वैद्य, सुरेखा शेटे व अरुणा बगणार यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.




विद्यार्थिनींनी सुरेल स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. या गीतासाठी इंद्रभान कोल्हाळ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर इयत्ता सहावीतील विद्यार्थिनींनी 'हिंदी भाषा राष्ट्र की भाषा' या गीतावर आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. नृत्याला प्रशांत दिवेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

हिंदी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी भाषणे, काव्यगायन व नाटिका सादर करून हिंदी भाषेचे विविध पैलू व सौंदर्य उलगडले. यावेळी हिंदी विभागाच्या वतीने आयोजित काव्यगायन, भाषण, हस्ताक्षर आदी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व भाषिक कौशल्यांना व्यासपीठ मिळाल्याने कार्यक्रम विशेष आकर्षक ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिंदी विभागाने विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण नियोजन विभागाच्या वतीने करण्यात आले. खंडू वैद्य यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभागामुळे हिंदी दिनाचा कार्यक्रम आनंददायी, उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## विद्यार्थ्याला काठीने मारहाण; पाथर्डीत शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल

### जवखेडे येथील शाळेतील प्रकार

● **पाथर्डी । वीरभूमी –** पाथर्डी तालुक्यातील जवखेडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीत शिकणाऱ्या दहा वर्षीय विद्यार्थ्याला शिक्षकाने काठीने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी विद्यार्थ्याच्या आईने पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

रुद्राक्ष बापुराव सोनवणे हा जवखेडे येथील प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीत शिक्षण घेत आहे. गुरुवारी (दि. ११) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्याची आई त्याला शाळेत सोडून गेली होती. सायंकाळी पाच वाजता आई त्याला घेण्यासाठी शाळेत पोहोचली असता रुद्राक्ष रडत असल्याचे तिच्या निदर्शनास आले.

आईने रडण्याचे कारण विचारले असता, वर्गातील एका विद्यार्थ्याच्या पाठीला हात लावल्याच्या कारणावरून शिक्षकाने काठीने मारहाण केल्याचे रुद्राक्षने सांगितले. शिक्षकाच्या मारहाणीमुळे तो घाबरला असल्याचेही त्याने आईला सांगितले. त्यानंतर आईने त्याला शाळेतून घरी नेले.

घटनेची माहिती घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्याच्या आईने संबंधित शिक्षकाविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी शिक्षक संदीप कोंडीराम मचे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

विद्यार्थ्यांना शिस्त लावताना शारीरिक मारहाण करणे गंभीर मानले जाते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संयम व योग्य पद्धतीचा अवलंब करणे अपेक्षित आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, शाळांमध्ये विद्यार्थ्यांशी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होऊ नये, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

SPOT NEWS



## आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सचिन लगड यांचा गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे निरीक्षक तथा यशवंतराव चव्हाण विद्यालय, घारगावचे विद्यमान मुख्याध्यापक सचिन सयाजीराव लगड यांना अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग आणि अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'आदर्श गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ, प्रामाणिक आणि विद्यार्थी केंद्रित कार्याची दखल घेत त्यांचा हा सन्मान करण्यात आला. सचिन लगड यांनी ९ डिसेंबर १९९१ रोजी ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या श्री. रामेश्वर विद्यालय, चिखली येथून आपल्या शैक्षणिक सेवेला सुरुवात केली. अतिशय दुर्गम व छोट्या गावात विद्यालयाच्या स्थापनेपासून त्याच्या शैक्षणिक विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीला प्राधान्य देत त्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले. १९९५ मध्ये विनाअनुदानित कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून नागपूर येथे विनाअनुदानित शाळांतील सेवकांच्या प्रश्नांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनात लगड यांनी सक्रिय सहभाग घेतला. या आंदोलनातून विनाअनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सुमारे ८७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होण्यास मदत झाली. शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांसाठी त्यांनी घेतलेल्या या भूमिकेची दखल संस्थेने घेत त्यांची छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या निरीक्षकपदी नियुक्ती केली.

## 'गुन्हा दाखल केल्याने जीवाला धोका'; आरोपींना तातडीने अटक करा

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर संबंधितांकडून आपल्या जीवाला धोका असल्याचा आरोप करत सनी ज्ञानेश्वर जगधने (रा. रंगभवन, सर्जेपुरा, अहिल्यानगर) यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (गवई) शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम अली शेख, विजय शिरसाठ, नईम शेख आदी उपस्थित होते. जगधने यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ३(१)(ी), ३(१)(ी) अन्वये इनाम उल्लाह जिक्रिया खान, अमीर इनाम उल्लाह खान आणि मुतब्बीर इनाम उल्लाह खान यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, घास गल्ली, कापड बाजार, अहिल्यानगर येथे आरोपींचे कपड्यांचे दुकान आहे. २ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता कपडे खरेदी करण्यासाठी ते या दुकानात गेले होते. त्यांनी खरेदी केलेले कपडे बदलण्यासाठी पुन्हा दुकानात गेल्यानंतर संबंधित व्यक्तींनी आपल्याला शिवीगाळ केली तसेच जातीवाचक अपमानास्पद शब्द वापरल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या घटनेनंतर जगधने यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध तक्रार दाखल केली. मात्र, गुन्हा दाखल झाल्यानंतर आपल्याला जीवे मारण्याची भीती निर्माण झाली असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# शेत-पाणंद रस्त्यांसाठी राज्यात 'महाअभियान'!

**२ ऑक्टोबरपर्यंत गावागावांत जनजागृती । शेतकऱ्यांनी रस्त्यांची माहिती तलाठी, ग्रामसेवकांकडे नोंदवावे : शरद पवळे**

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत बारमाही आणि हक्काचा रस्ता उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेअंतर्गत राज्यात १ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावागावांतील शेत-पाणंद रस्त्यांची माहिती संकलित केली जाणार असून, शेतकऱ्यांनी आपल्या शेतापर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची माहिती संबंधित तलाठी अथवा ग्रामसेवकांकडे नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानात गावाच्या नकाशावर अस्तित्वात असलेले तसेच नकाशावर नोंद नसलेले, मात्र प्रत्यक्ष वापरात असलेले डी/ई प्रकारातील शेत-पाणंद रस्ते यांची माहिती संकलित केली जाणार आहे. त्यानंतर आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या किंवा नोंदीअभावी विकासापासून वंचित असलेल्या शेतरस्त्यांना प्रशासकीय प्रक्रियेत आणण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



अभियानाच्या कालावधीत तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, सरपंच, कोतवाल आणि पोलीस पाटील यांच्या माध्यमातून गावागावांत जनजागृती केली जाणार आहे. दवंडी तसेच विविध माध्यमांतून शेतकऱ्यांपर्यंत अभियानाची माहिती पोहोचविण्यात येणार आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीमधून डी/ई प्रकारातील दोन शेत-पाणंद रस्त्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेताकडे जाणारा रस्ता नकाशावर आहे की नाही, त्याची सध्याची स्थिती काय आहे, तसेच रस्त्यावर अतिक्रमण किंवा अन्य अडथळे आहेत का, याची माहिती संबंधित तलाठी अथवा ग्रामसेवकांकडे नोंदविणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेतून राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये १३ हजार ४९७ रस्त्यांना मंजुरी देण्यात आली असून, या रस्त्यांची एकूण लांबी २० हजार ४५२ किलोमीटर आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या दळणवळणाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

शेतमालाची वाहतूक, ट्रॅक्टर व कृषी यंत्रसामग्रीची ने-आण, शेतकऱ्यांची दैनंदिन ये-जा आणि शेतीच्या विकासासाठी शेत-पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. अभियानातून संकलित होणारी माहिती भविष्यातील मोजणी, सीमांकन, अतिक्रमण निर्मूलन आणि रस्ता विकासाच्या कार्यवाहीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेतून राज्यातील ३४ जिल्ह्यांतील १३ हजार ४९७ रस्त्यांना मिळालेली मंजुरी आणि २० हजार ४५२ किलोमीटर रस्त्यांना मिळणारी गती हे महाराष्ट्रातील शिव-पाणंद चळवळीतील प्रत्येक संघर्षयोद्ध्याच्या सातत्यपूर्ण संघर्षाचे फलित आहे, असे महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले.

ते पुढे म्हणाले, आता प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतरस्त्याची माहिती प्रशासनाकडे नोंदविणे ही पुढची महत्त्वाची पायरी आहे. नकाशावरचा रस्ता असो किंवा प्रत्यक्ष वापरातील डी/ई प्रकारातील रस्ता असो, त्याची माहिती शासनाच्या अभियानात नोंदविल्यास शेतरस्त्यांच्या प्रश्नावर पुढील कार्यवाहीसाठी भक्कम आधार निर्माण होईल.

आपल्या शेताकडे जाणाऱ्या शेत-पाणंद रस्त्याची माहिती संबंधित तलाठी किंवा ग्रामसेवकांकडे नोंदवावी.

'शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी' या उद्दिष्टाला बळ देणाऱ्या या अभियानात राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या रस्त्याची नोंद करून या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रस्त्याची सध्याची स्थिती आणि अतिक्रमण अथवा अन्य अडथळ्यांची माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आणावी.

## शेवगाव सा.बां. उपविभागातील प्रल्हाद पाठक, शैलेश साबळे यांना सर्वोत्कृष्ट अभियंता पुरस्कार





**शेवगाव । वीरभूमी -**

शेवगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागातील तांत्रिक संवर्ग (स्थापत्य) विभागात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल उपविभागीय अभियंता प्रल्हाद अनंत पाठक आणि कनिष्ठ अभियंता शैलेश विष्णू साबळे यांना महाराष्ट्र शासनाचा सन २०२५-२६ चा सर्वोत्कृष्ट अभियंता पुरस्कार जाहीर झाला आहे. वैयक्तिक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, अधीक्षक अभियंता विवेक माळुंदे आणि कार्यकारी अभियंता युवराज कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अभियंता पाठक व कनिष्ठ अभियंता साबळे यांनी शेवगाव उपविभागात विविध विकासकामे प्रभावीपणे राबविली. या कामांचे समाजहिताच्या दृष्टीने केलेल्या मूल्यमापनात उल्लेखनीय योगदान ठरल्याने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा १५ सप्टेंबर हा जन्मदिवस दरवर्षी अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या वतीने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्वोत्कृष्ट अभियंत्यांना वैयक्तिक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आमदार मोनिका राजळे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रल्हाद पाठक व शैलेश साबळे यांचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, राज्य शासनातर्फे राबविण्यात आलेल्या १०० दिवसीय कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत शेवगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागाने नाशिक विभागात द्वितीय क्रमांक पटकावला होता. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक यांना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजेभोसले यांच्या हस्ते यापूर्वी सन्मानित करण्यात आले होते.

## आधुनिक तंत्रज्ञान, शेतकरी अनुभव अन् शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन

**दहिगाव-ने कृषी विज्ञान केंद्रात शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद**

**शेवगाव । वीरभूमी -**

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे आत्मा, अहिल्यानगर यांच्या प्रायोजकत्वाखाली शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम उत्साहात पार पडला. आधुनिक कृषी तंत्रज्ञान, प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यामुळे हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र घुले, जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले व डॉ. क्षितीज घुले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. कौशिक यांच्या हस्ते झाले.

कमी क्षेत्रात अधिक उत्पादन व नफा मिळवून देणाऱ्या संरक्षित शेतीविषयी चितळी येथील प्रगतिशील शेतकरी हर्षवर्धन ताठे यांनी मार्गदर्शन केले. कांदा पिकातून एकरी ३० टन उत्पादन घेण्याबाबत सर्फराज सय्यद यांनी अनुभव मांडले. चांगल्या प्रतीच्या बियाण्यांची निवड, मल्चिंग बेड, ठिबक सिंचन व योग्य लागवड पद्धतीचा अवलंब केल्यास एकरी ४५ टनांपर्यंत उत्पादन मिळू



शकते, असे त्यांनी सांगितले. गतहंगामात त्यांनी एकरी ३३ टन उत्पादन घेतले.

ऊस शेतीतील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची गरज, फायदे व कार्यपद्धती याबाबत फायलो ॲग्रीटेकचे राज्य विक्री व विपणन प्रमुख विशालकुमार मिरजे यांनी माहिती दिली. सेंद्रिय भाजीपाला उत्पादनातील संधी व विपणनाबाबत मृदगंधच्या प्रमुख कल्याणी मुरदारे यांनी मार्गदर्शन केले.

नैसर्गिक व सेंद्रिय शेती तसेच विविध पिकांमधील आधुनिक तंत्रज्ञानावर डॉ. एस. एस. कौशिक यांनी मार्गदर्शन केले. आधुनिक कृषी यंत्रे, काटेकोर पाणी व्यवस्थापन व सूक्ष्म सिंचनाबाबत कृषी अभियांत्रिकी विषयतज्ज्ञ अभियंता राहुल पाटील यांनी माहिती दिली. फळपिकांतील सघन व अतिसघन लागवड तंत्रज्ञानाची माहिती उद्यानविद्या विषयतज्ज्ञ एन. बी. दहातोंडे यांनी दिली.

यावेळी शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्राला भेट देऊन विविध प्रात्यक्षिकांची माहिती घेतली. प्रक्षेत्र व्यवस्थापक प्रकाश हिंगे यांनी भेटीचे नियोजन केले.

कार्यक्रमास बाळासाहेब मरकड, मिलिंद नाना कुलकर्णी, अभिजित घुले, विश्वास कर्डिले, गणेश वाबळे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते. आत्मा, अहिल्यानगरचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे यांचे मार्गदर्शन लाभले. कृषी विस्तार विभागप्रमुख सचिन बडधे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले, तर एन. बी. निबे यांनी आभार मानले.

## महाराष्ट्राच्या गणेशोत्सव परंपरेचे होणार जागतिक दस्तऐवजीकरण

**Bappa.org मंचावर नागरिकांना सहभागाचे आवाहन**

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि लोकजीवनाशी घट्ट जोडलेला गणेशोत्सव राज्य शासनाने 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केला आहे. या उत्सवाच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील गणेशोत्सव परंपरेचे डिजिटल स्वरूपात कायमस्वरूपी दस्तऐवजीकरण करण्यासाठी **bappa.org** हा अधिकृत डिजिटल मंच सुरू करण्यात आला आहे. नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

या उपक्रमात केवळ मोठ्या सार्वजनिक गणेश मंडळांचीच नव्हे, तर घराघरातील गणेशोत्सवाचीही नोंद केली जाणार आहे. पिढ्यान्पिढ्या जपल्या जाणाऱ्या घरगुती गणपतींच्या परंपरा, कुटुंबाची सजावट, स्थानिक लोककला, गणेशोत्सवाशी संबंधित आठवणी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरांना या डिजिटल संग्रहात स्थान मिळणार आहे. त्याचबरोबर पारंपरिक गणेशमूर्ती घडविणारे मूर्तिकार आणि विविध हस्तकला कारागिरांच्या कलेचीही नोंद केली जाणार आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नागरिकांना कोणतेही स्वतंत्र प डाऊनलोड करण्याची किंवा क्लिष्ट प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता नाही. आपल्या घरातील किंवा मंडळातील गणपतीचा एक चांगल्या दर्जाचा फोटो आणि त्यासोबत गणेशोत्सवाची माहिती देणाऱ्या दोन ते चार ओळी **bappa.org** या मंचावर पाठविता येतील.

मंचावर प्राप्त झालेल्या माहितीची संबंधित तज्ज्ञ समितीमार्फत पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित योगदानकर्त्यांच्या नावासह अधिकृत नोंद क्रमांक देण्यात येणार आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील गणेशोत्सवाच्या विविध परंपरांची अधिकृत आणि कायमस्वरूपी डिजिटल नोंद तयार होणार आहे. हा संग्रह भावी पिढ्यांसाठी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार आहे.

नागरिक, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, पारंपरिक मूर्तिकार आणि हस्तकला कारागिरांनी आपल्या परिसरातील गणेशोत्सवाची वैशिष्ट्यपूर्ण माहिती लर्रिर्.ीस या अधिकृत मंचावर नोंदवावी आणि महाराष्ट्राच्या समृद्ध गणेशोत्सव परंपरेचे दस्तऐवजीकरण करण्याच्या या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य : नगराध्यक्ष मायाताई मुंढे

**पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत ८०० विद्यार्थ्यांचा सहभाग**

**शेवगाव । वीरभूमी-**

शहराची प्रथम नागरिक म्हणून येणाऱ्या पिढ्यांसाठी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन यांना आपले सर्वोच्च प्राधान्य राहणार आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळांच्या माध्यमातून हा उद्देश निश्चितच सफल होईल. या कार्यशाळेत तयार केलेल्या गणेशमूर्तींची विद्यार्थ्यांनी आपल्या घरी प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी आग्रह धरावा, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ. मायाताई अरुण मुंढे यांनी केले.

नगर परिषद आणि पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पाचवी ते आठवीच्या सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक



सुनील डाखुरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत उत्कृष्ट मूर्ती तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्षा मायाताई मुंढे बोलत होत्या.

यावेळी शाळेचे गुणवंत माजी विद्यार्थी व राष्ट्रीय खेळाडू अरुण मुंढे, प्रा. उमेश घेवरीकर आणि कलाशिक्षक सुनील डाखुरकर उपस्थित होते.

माजी विद्यार्थी अरुण मुंढे म्हणाले, याच शाळेचा माजी विद्यार्थी म्हणून वाटणारा अभिमान आणि आनंद याचे मोल कशातही होऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणारा हा उपक्रम पर्यावरण संवर्धनासोबतच प्रदूषणमुक्तीसाठीही बळ देणारा ठरेल.

शाळेच्या वतीने नगराध्यक्षा सौ. मायाताई मुंढे आणि अरुण मुंढे यांचा झाडाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश मोरे यांनी केले, तर आभार प्रवीण बैरागी यांनी मानले.

# ‘कामगार-श्रमिकविरोधी’ सरकारविरोधात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा एल्गार!

## कॉ. नामदेवराव चव्हाण । ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या जिल्हा मेळाव्यात प्रलंबित मागण्या तातडीने सोडविण्याची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र सरकार एक नंबरचे कामगार व श्रमिकविरोधी सरकार आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागील तीन वर्षांपासूनच्या एकाही मागणीची राज्य सरकारने पूर्तता केलेली नाही. महाराष्ट्र सरकार, ग्रामविकास विभाग व अर्थ खात्याची नकारात्मक भूमिका असल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात बैठका घेऊन राज्यव्यापी आंदोलनाचा निर्धार करण्यात आला असून, मुख्यमंत्र्यांच्या घरावर मोर्चा काढून घेराव घालण्यात येणार असल्याची घोषणा राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ (आयटक)चे राज्य सेक्रेटरी कॉ. नामदेवराव चव्हाण यांनी केली.

अहमदनगर जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटना संलग्न आयटकचा जिल्हा मेळावा शहरातील बुरुडगाव येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात पार पडला. या मेळाव्यात मार्गदर्शन करताना कॉ. नामदेवराव चव्हाण बोलत होते. जिल्हा सेक्रेटरी ॲड. सुधीर टोकेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडला. यावेळी राज्य कौन्सिल सदस्य कॉ. मारुती सावंत, कॉ. बाळासाहेब आल्हाट, कॉ. संतोष लहासे, कॉ. एकनाथ वखरे, धीरज थोरात, कॉ. बाळासाहेब लोखंडे, गोवर्धन ससाणे, सिद्धार्थ ओहोळ, संदीप झेंडे, बाळू केशर, अब्दुल शेख, अरुण राऊत, उपाध्यक्ष मारुती कटारे, बाळासाहेब मगर, विजय सोनवणे, नितीन कुरुमकर, मुकेश ससाणे, बाळासाहेब गाडेकर, परमेश्वर बोरुडे, शिंदे आनंद, लक्ष्मण शिंदे, अश्विन शिंदे, रमेश वाघमारे आदींसह जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांतील ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

कॉ. नामदेवराव चव्हाण पुढे म्हणाले की, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या नवीन मागण्या नाहीत. त्यांच्या ज्या प्रलंबित मागण्या आहेत, त्या सरकारने मान्य केलेल्या आहेत. त्यामुळे मान्य केलेल्या मागण्यांचीच तातडीने अंमलबजावणी करावी, अशी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची मागणी आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

जिल्हा परिषदेत १० टक्के चतुर्थ श्रेणी कर्मचारी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून भरती केले जातात. मात्र, २०१९ नंतर एकही पदभरती झालेली नाही. गंभीर बाब म्हणजे चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाच्या भरतीलाच बंदी आणण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून चतुर्थ श्रेणीच्या नोकरभरतीची दारे बंद झाली असल्याचा आरोप कॉ. चव्हाण यांनी केला. ग्रामविकास खात्याचे मंत्री यांना काही प्रश्न समजत नाहीत, ते मुख्यमंत्र्यांचे बॉडीगार्ड असल्याप्रमाणे वागतात, अशी टीका करत राज्यव्यापी आंदोलनाची तयारी सुरू असल्याचेही स्पष्ट केले.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये यावतकर समितीचा अहवाल तातडीने लागू करावा, पेन्शन योजना लागू करावी, दरमहा पगार वेळेत झाला पाहिजे, तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर पेन्शन मिळावी आणि त्यानंतर ग्रॅज्युटी मिळावी, या महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश आहे. महासंघाचे अध्यक्ष कॉ. तानाजी ठोंबरे यांनीही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न न सोडवल्यास बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असे फोनवरून कळविल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



ॲड. कॉ. सुधीर टोकेकर यांनी जिल्हा परिषद नोकरभरती तातडीने सुरू करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून १० टक्के कर्मचाऱ्यांची भरती तातडीने करावी, अशी मागणी केली. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या संधी बंद होऊ नयेत, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच तालुका बैठका घेण्यात येणार असल्याचे कॉ. मारुती सावंत यांनी सांगितले. या बैठकांमधून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत जनजागृती करून राज्यव्यापी आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर येथे राज्यव्यापी आयटक कामगार संघटनेचे अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती कॉ. संतोष लहासे व कॉ. बाळासाहेब आल्हाट यांनी दिली. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार या जिल्हा मेळाव्यात व्यक्त करण्यात आला.

# स्वाती टाकळकर, विजय म्हस्के यांचा सत्कार

## विविध पदांवर निवड झाल्याबद्दल ढोरजळगाव ग्रामस्थांकडून गौरव

**● शेवगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील ढोरजळगाव येथील डाके परिवाराची कन्या तसेच ढोरजळगाव-शे येथील कै. शरदकुमार रावसाहेब फसले व पत्रकार ज्ञानेश्वर फसले यांची भाची सौ. स्वाती संभाजीराव टाकळकर (डाके) यांची पैठण येथे शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल तसेच विजय आसाराम म्हस्के यांची लोहार समाज महासंघाच्या कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ढोरजळगाव शे, ढोरजळगाव ने येथील ग्रामस्थ, वृद्धेश्वर उद्योग समूह, नागेबाबा मल्टीस्टेट व मित्र परिवाराच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य बापूसाहेब पाटेकर, शेवगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती देविदास पाटेकर, सरपंच बाळासाहेब कराड, वृद्धेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष महादेव पाटेकर, उपाध्यक्ष अनंता उकिरडे, सरपंच गणेश कराड, राजेंद्र गिऱ्हे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे तालुका सरचिटणीस देविदास सांगळे, शेषराव देशमुख, शेषराव गिऱ्हे, संभाजी फसले, विकास देशमुख, डॉ. प्रशांत बुधवंत, कैलास देशमुख, डॉ. देविदास देशमुख, सुखदेव उकिरडे, वसंतराव गिऱ्हे मेजर, अरुण उकिरडे, रुस्तुम गिऱ्हे, माणिकराव बर्गे, आदिनाथ कराड, ॲड. भागचंद उकिरडे, संभाजीराजे टाकळकर, निलेश वाकडे सर, चंद्रकांत गिऱ्हे, लक्ष्मणराव डोळस, पत्रकार दीपक खोसे, विजय पाटेकर, योगेश महाराज देशमुख, रामभाऊ पाटेकर, संदीप गिऱ्हे, गणेश जायभाये, संतोष अकोलकर, हसन शेख, अतुल लांडे, बजरंग ठोंबळ, सुभाष उकिरडे, विजय ससाने, अविनाश महाराज जीवडे, पत्रकार ज्ञानेश्वर फसले आदींसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार सोहळ्यात स्वाती टाकळकर व विजय म्हस्के यांचे विविध मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# भक्तीच्या वाटेवरून शिक्षणाच्या दिशेने

## भांडेवाडीच्या युवकांचा आदर्श उपक्रम । हरिनाम सप्ताहात स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेचे भूमिपूजन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

‘भक्तीबरोबरच शिक्षणाची ज्योत तेवत ठेवा. शरीर निरोगी ठेवा, व्यसनांपासून दूर रहा आणि अभ्यासाच्या माध्यमातून कुटुंबासह समाजाचे भविष्य घडवा,’ असे प्रतिपादन तारकेश्वर गडाचे महंत आजिनाथ महाराज शास्त्री यांनी केले.

भांडेवाडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यातील काल्याच्या कीर्तनावेळी स्पर्धा परीक्षा अभ्यासिका व मार्गदर्शन केंद्राचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी युवकांशी संवाद साधताना आजिनाथ महाराज शास्त्री बोलत होते.



ते म्हणाले, ‘परिस्थिती माणसाला थांबवू शकते; मात्र जिद्द, शिक्षण आणि योग्य दिशा असेल तर परिस्थिती बदलण्याची ताकद तरुणांमध्ये आहे. छोट्याशा वाडीतील भटकंती, मेंढपाळी व ऊसतोड मजुरीच्या कष्टमय जीवनाशी नाते असलेल्या धनगर समाजातील युवकांनी शिक्षण घेऊन आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे आणि समाजासमोर आदर्श निर्माण करावा.’

हरिनाम सप्ताहातून मिळालेली भक्तीची ऊर्जा शिक्षणाच्या दिशेने वळविण्याचा संकल्प भांडेवाडीच्या युवकांनी केला आहे, ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या या उपक्रमाचे परिसरातील ज्येष्ठ नागरिकांकडून कौतुक होत आहे. ‘आजचा युवक हा समाजाचा आधार आहे. त्यामुळे युवकांच्या हाती व्यसनाची बाटली नव्हे, तर ज्ञान देणारे पुस्तक असावे,’ असा संदेशही त्यांनी दिला.

हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक परिवर्तनाचा विचार पुढे नेण्याचे काम भांडेवाडीतील युवकांनी केले असल्याची भावना उपस्थित नागरिक व महिलांनी व्यक्त करून युवकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युवकांच्या वतीने समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन अभ्यासिकेसाठी तन-मन-धनाने योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

> बदलत्या काळानुसार हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून भक्तीपासून प्रगतीकडे आणि व्यसनमुक्तीपासून उच्च शिक्षणाकडे असा सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.
>
> **– भाऊसाहेब गोरे,** आदर्श शिक्षक

कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, भाविक, वारकरी, टाळकरी व सप्ताहाचे आयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन करून उपस्थितांना महाप्रसादाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन आदर्श शिक्षक भाऊसाहेब गोरे यांनी केले. त्यांनी अभ्यासिका सुरू करण्यामागील उद्देशही स्पष्ट केला.

# ढोकेश्वर विद्यालयात जादूच्या प्रयोगांतून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश

## आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत कार्यक्रम । १३०० विद्यार्थ्यांनी घेतला प्रयोगांचा आनंद

**● पारनेर । वीरभूमी–**

जादू म्हणजे कौशल्य, हातचलाखी आणि विज्ञान; तर भोंदूगिरी म्हणजे याच कौशल्याचा अथवा अज्ञानाचा गैरवापर होय. जादूगार मनोरंजनासाठी प्रयोग सादर करतो आणि स्वतःला देव अथवा चमत्कारी शक्तीचा मालक असल्याचे सांगत नाही. मात्र, भोंदू बाबा अशाच प्रयोगांना दैवी शक्ती, चमत्कार किंवा उपचार म्हणून सादर करून लोकांकडून पैसा, मान-सन्मान अथवा अनुयायी मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे समाजाने अशा भोंदू बाबांपासून दूर राहावे आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जादूच्या प्रयोगांमागील वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगावा, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी केले.




पारनेर तालुक्यातील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ‘आनंददायी शनिवार’ उपक्रमांतर्गत अरुण वाळुंज टॉक्स व्यासपीठाच्या माध्यमातून जादूच्या प्रयोगांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जादूगार प्रकाश शिरोळे यांनी विविध जादूचे प्रयोग सादर करत विद्यार्थ्यांना त्यामागील कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोनाबाबत मार्गदर्शन केले. इयत्ता पाचवी ते बारावीतील सुमारे १३०० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. काही विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोगांमध्ये सहभागी होण्याची संधीही मिळाली. प्रयोग पाहून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील ‘राजे छत्रपती’ हे गीत सादर करून वातावरण शिवमय केले. विद्यार्थ्यांनी ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या घोषणा देत गीताला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कला समन्वयक राजेंद्र ढोणे, भांडार प्रमुख प्रा. देविदास आठरे, परीक्षा प्रमुख बाबासाहेब जाधव, प्रसिद्ध चित्रपट गीतकार अरुण वाळुंज, तसेच रवींद्र मते, अतुल सैद, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे, निलेश पाचर्णे, सोनाली माळवदे, योगेश मांडगे, आतिष झावरे, सचिन महानवर, पोपट जगदाळे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, सिमा खोसे, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, रुपाली घोलप, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, पवन कुटे, शिरीष राऊत, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बांबेरे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी मानले.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानकडून ‘गौरी-गणपती सजावट स्पर्धा २०२६’चे आयोजन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने गौरी-गणपती उत्सवानिमित्त घरगुती सजावटीतील कलात्मकता, सर्जनशीलता आणि पारंपरिक संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ‘गौरी-गणपती सजावट स्पर्धा २०२६’ चे आयोजन करण्यात आले आहे.

संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक सणांच्या निमित्ताने नागरिकांसाठी स्पर्धा व विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून यंदा या सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १५ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास ७००१ रुपये, द्वितीय क्रमांकास ५००१ रुपये, तर तृतीय क्रमांकास ३००१ रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय अन्य आकर्षक पारितोषिकेही ठेवण्यात आली आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी आपल्या गौरी-गणपती सजावटीचा ६० सेकंदांपर्यंतचा व्हिडिओ व फोटो, त्यासोबत आपले नाव व पत्ता आयोजकांकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या अधिकृत फेसबुक, इन्स्टाग्राम व यूट्यूब खात्यांना फॉलो करणे बंधनकारक आहे.

सजावटीचा व्हिडिओ पोस्ट करताना संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या इन्स्टाग्राम पेजसोबत कोलॅबोरेशन करणे, फेसबुक पेजला टॅग करणे आणि पोस्टमध्ये ‘संजीवनी युवा प्रतिष्ठान’ हा हॅशटॅग वापरणे आवश्यक आहे.

गौरी-गणपती सजावटीच्या माध्यमातून नागरिकांच्या कल्पकता व सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, तसेच पारंपरिक सणाच्या माध्यमातून कलात्मकतेला प्रोत्साहन मिळावे, हा स्पर्धेचा उद्देश आहे. कोपरगाव शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली कलात्मकता सादर करावी, असे आवाहन संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.